आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN
संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

KAYASTH
Caters & Event Management
Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ५०७ बुधवार दि ०४ नोव्हेंबर २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

देशद्रोही कोण ते समोरासमोर चर्चा करु; राहुल गांधीचं मोदींना पुन्हा चर्चेचं खुलं आव्हान...

वृत्तसंस्था-दिल्ली

गेल्या अनेक दिवसांपासून देशातलं राजकारण एसआयआरमधील कथित घोळ आणि इतर युवकांच्या प्रश्नांभोवती फिरत आहे. मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या राजीनाम्याची मागणी, त्यासाठी विरोधकांचं दिल्लीतलं मोठं आंदोलन आणि त्यातच आता भर पडली आहे, ती राहुल गांधी विरुद्ध पीएम मोदी यांच्या राजकीय लढाईची. राहुल गांधी यांचं पीएम नरेंद्र मोदी यांना समोरासमोर चर्चेचं आव्हान आलं आहे. देशद्रोही कोण, परदेशी शक्तींशी कोणाचे संबंध? यावर चर्चा करु, असं राहुल गांधी यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटलं आहे. या ट्विटमधून त्यांनी आपण समोरासमोर चर्चा करु, असं आव्हान राहुल गांधींनी मोदींना दिलं आहे. मोदीजी, तुम्हाला मी आव्हान देऊन २४ तास उलटले आहेत. तुम्ही विरोधकांना देशविरोधी ठरवता. मग चला, कोणत्याही व्यासपीठावर, कोणत्याही ठिकाणी माझ्याशी जाहीर चर्चा करा. देशविरोधी कोण आहे? परकीय शक्तींशी कोणाचे संबंध आहेत? आणि हे संबंध नेमके कशा स्वरूपाचे आहेत? या सर्व प्रश्नांची उत्तरे खुल्या चर्चेतून समोर येऊ द्या. लवकरात लवकर ही चर्चा घडवून आणा. घाबरू नका. या चर्चेला आपण दोघेही उपस्थित राहू. माध्यमांचे प्रतिनिधी असतील, देशातील तरुणाईही असेल. समोर एक टेबल असेल. तुम्ही एका बाजूला बसा आणि मी दुसऱ्या बाजूला बसतो. या चर्चेसाठी तुम्हाला हवा तो परीक्षक नेमा. अगदी मोहन भागवतजींनाही परीक्षक म्हणून बसवायला माझी हरकत नाही. या चर्चेत देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर, आर्थिक धोरणांवर प्रश्न उपस्थित होतील. अमेरिकेसोबतचा करार नेमका कसा झाला, तो करण्याची घाई का करण्यात आली, इतक्या कमी वेळेत हा निर्णय का घेतला? हा निर्णय तुम्ही एकट्यानेच का घेतला? मंत्रिमंडळाला त्याची माहिती का देण्यात आली नाही? अदानी प्रकरण का बंद करण्यात आले? एपस्टीन प्रकरणासह अशा अनेक मुद्द्यांवर आपण सविस्तर आणि खुली चर्चा करू. चला, दूध का दूध आणि पाणी का पाणी होऊन जाऊ द्या. सत्य काय आहे, हे देशासमोर स्पष्ट होऊ द्या. तुम्ही माझ्यावर आरोप करता ना? मग या, समोरासमोर चर्चा करूया. या चर्चेतून सर्व गोष्टी स्पष्ट होतील. इतर प्रकरणांमध्ये तुम्ही माझ्याविरोधात मानहानीचे खटले दाखल केले आहेत. माझ्या मते, असे सुमारे ४५ खटले माझ्यावर दाखल आहेत. मात्र, परकीय शक्तींशी संबंध असल्याच्या आरोपांवर चर्चा करण्याचे मी आव्हान दिल्यानंतर तुम्ही मानहानीचा खटला दाखल केलेला नाही. मग या मुद्द्यावरही खटला दाखल करा. त्यावरही आपण जाहीरपणे चर्चा करू. दरम्यान, सोमवारी राहुल गांधी यांनी मोदीजी खोटं बोलणं थांबवा, तुम्ही परकीय मदतीने पंतप्रधान झाला आहात. त्यामुळेच तुम्ही आजही पदावर आहात. तुमची अर्थव्यवस्था परकीय हितसंबंधांच्या

नियंत्रणाखाली आहे. त्यांना तुम्ही पाठिंबा दिला आबे. परकिय सोशल मीडियाही तुमच्या बाजून आहे. मी या विषयावर तुम्हाला खुलं चर्चेचं आव्हान देतो, कोणतंहीव व्यासपीठ, वेळ तुम्ही म्हणाल तीस हिंमत असेल तर या, तुम्ही येणार नाहीत, कारण तुम्हाला भीती वाटत असावी, असं राहुल गांधी यांनी मोदींना यापूर्वी आव्हान दिलं होतं.

विधान परिषद निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेस ॲक्शन मोडमध्ये....!

मोठा निर्णय घेतला; चार नेत्यांवर महत्त्वाची जबाबदारी.....

वृत्तसंस्था-नागपूर

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकांचा निकाल लागला आहे. यात तीन जागा महाविकास आघाडीला तर दोन जागा महायुतीला मिळाल्या आहेत. यानंतर आता काँग्रेसने मोठा निर्णय घेतला आहे. यामुळे राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. नुकत्याच पार पडलेल्या नागपूर पदवीधर, पुणे पदवीधर आणि अमरावती शिक्षक मतदारसंघातील विधान परिषद निवडणुकांच्या निकालांचा सखोल अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने चार सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेवरून ही समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य बाळासाहेब थोरात, खासदार चंद्रकांत हंडोरे, आरिफ नसीम खान आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप यांचा समावेश आहे. ही समिती संबंधित मतदारसंघांतील निवडणूक प्रक्रिया, पक्षाची प्रचार रणनीती, निवडणुकीतील विजय अथवा पराभवाची कारणे आणि पक्षांतर्गत समन्वयाचा सविस्तर आढावा घेणार आहे. निवडणुकीदरम्यान पक्षाच्या पातळीवर काही त्रुटी राहिल्या होत्या का, याचीही तपासणी केली जाणार आहे. तसेच मागील काळातील निवडणुकांचा अभ्यास करून त्यांचा नुकत्याच झालेल्या निवडणुकांवर काही प्रतिकूल परिणाम झाला होता का, याचाही शोध घेतला जाणार आहे. तसेच भविष्यातील निवडणुकांसाठी पक्षाची रणनीती अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने समिती आवश्यक शिफारसी करणार आहे. समितीने आपला सविस्तर अहवाल तीन आठवड्यांच्या आत महाराष्ट्र राज्याचे प्रभारी डॉ. सिरीवेल्ला प्रसाद यांच्याकडे सादर करणार असून त्याची प्रत प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनाही देणार आहे.

भाजप-शिंदेसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ २ जागांवर समाधान मानावे लागले आहे. काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी महाराष्ट्रातील सर्वात प्रतिष्ठित मतदारसंघांपैकी एक मानल्या जाणाऱ्या नागपूर विभागीय पदवीधर मतदारसंघावर पुन्हा एकदा विजय मिळवला आहे. पुणे पदवीधर मतदारसंघातही भाजपच्या प्रतिष्ठेला मोठा धक्का बसला आहे. येथे भाजपच्या उमेदवार स्मिता योगेश जाधव यांचा महाआघाडीच्या उमेदवार हर्षदा देशमुख यांच्याकडून पराभव झाला. विदर्भातील अमरावती शिक्षक मतदारसंघात शिंदे गटाच्या विद्यमान आमदार किरण सरनाईक पुन्हा विजयी झाले आहेत.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनसंचलनाचा प्रहरी!

शेतकऱ्याची व्याख्या काय?

भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आणि संपूर्ण सामाजिक व्यवस्थेचा आधारस्तंभ मानला जाणारा शेतकरी हा राजकीय भाषणांचा, अनुदानांच्या विविध घोषणांचा आणि कर्जमाफीच्या आश्वासनांचा नेहमीच केंद्रबिंदू राहिला आहे. परंतु, अतिशय आश्चर्याची आणि दुर्दैवी गोष्ट म्हणजे स्वातंत्र्याच्या साडेसात दशकांनंतरही भारतीय राज्यघटनेत, संसदेच्या कोणत्याही कायद्यात किंवा शासनाच्या अधिकृत अधिसूचनेत ङ्गशेतकरीफ या शब्दाची स्वयंस्पष्ट आणि सर्वसमावेशक अशी अधिकृत कायदेशीर व्याख्याच उपलब्ध नाही. ज्या घटकाच्या नावाने सरकारी तिजोरीतून आणि करदात्यांच्या खजिन्यातून दरवर्षी लाखो कोटी रुपये औदार्याने खर्च केले जातात, त्या ङ्गशेतकऱ्याचीफ कायदेशीर व्याख्याच नसल्याने हा अथांग निधी नेमका कोणाच्या घशात चालला आहे, हा गंभीर आणि अस्वस्थ करणारा प्रश्न आहे. ङ्गआंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते,फ अशी भयानक अवस्था आज देशातील कृषी धोरणांची, अनुदानांच्या वाटपाची आणि तिजोरीतील निधीच्या खर्चाची झाली आहे का, अशी अत्यंत रास्त शंका घेण्यास इथे पूर्ण वाव आहे. १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाल्यानंतर किंवा १९४३ च्या भीषण बंगाल दुष्काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातील जमीन सुधारणा कायद्यांमध्ये (उदा. ३२ग कायदा) कुठेही ङ्गशेतकरीफ म्हणजे नेमके कोण, यावर कोणतीही ठोस कायदेशीर भूमिका घेतली गेली नाही. राज्यघटनेनुसार ङ्गकृषीफ हा राज्यसूचीतील विषय असल्याने केंद्र आणि राज्य सरकारे आपापल्या प्रशासकीय सोयीनुसार विविध आदेशांद्वारे ङ्गशेतकरीफ ठरवतात. या गोंधळामुळे शहरात राहणारे कागदोपत्री जमीनमालक किंवा राजकीय वजन असलेले बडे व्यावसायिक सरकारी अनुदाने, करसवलती आणि कर्जाचे लाभ सहज लाटतात; तर प्रत्यक्ष शेतात दिवसरात्र घाम गाळणारे भूमिहीन शेतमजूर, बटाईदार, कंत्राटी शेतकरी आणि महिला शेतकरी या सरकारी लाभांपासून कायम वंचित राहतात. कायद्यात स्पष्ट आणि सर्वमान्य व्याख्या नसल्यामुळे सर्वोच्च न्यायालयालासुद्धा वेगवेगळ्या याचिकांमध्ये प्रकरणाच्या संदर्भानुसार अर्थ लावावा लागला आहे. ङ्गराजस्थान राज्य वि. गंगा साहेब (१९८४)फ प्रकरणात न्यायालयाने नमूद केले होते की ङ्गफार्मरफ ही एकसमान संकल्पना नसून ती जमिनीच्या मालकीशी किंवा प्रत्यक्ष शेतीकामाशी जोडली जाते. ङ्गपी. राम रेड्डी वि. आंध्र प्रदेश (१९८८)फ प्रकरणात न्यायालयाने सरकारला स्पष्ट बजावले होते की, लाभ वितरित करताना केवळ कागदोपत्री मालक आणि प्रत्यक्ष शेतात काम करणारा कष्टकरी यांच्यात स्पष्ट भेद केला पाहिजे. ङ्गपी. व्ही. कृष्ण रेड्डी (१९९४)फ प्रकरणात कृषी कर्ज योजनांमध्ये अचूक व्याख्येअभावी होणाऱ्या गैरवापरावर बोट ठेवले गेले, तर ङ्गसूरज भान वि. फायनान्शियल कमिशनर (१९७५)फ प्रकरणात भूमिहीन पण प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या व्यक्तीलाही कृषक मानण्याची गरज व्यक्त केली गेली. ङ्गगौरवकुमार बन्सल वि. भारत सरकार (२०११)फ या जनहित याचिकेत तर न्यायालयाने स्पष्ट म्हटले होते, की ङ्गशेतकरीफ संज्ञा अस्पष्ट असल्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचे योग्य दस्तऐवजीकरण होत नाही; परिणामी पीडित कुटुंबांना मिळणारी शासकीय भरपाई व दिलासा मिळण्यात मोठ्या अडचणी निर्माण होतात. भारतातील वाढत्या शेतकरी आत्महत्या आणि गंभीर शेतीसंकटावर मात करण्यासाठी २००४ ते २००६ दरम्यान डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली ङ्ग राष्ट्रीय शेतकरी आयोग म स्थापन करण्यात आला होता. या आयोगाने पाच सविस्तर अहवाल सादर करून सर्वसमावेशक उत्पादन खर्चावर (सी २) किमान ५० टक्के नफा जोडून ङ्गकिमान आधारभूत मूल्यफ देण्याची, शेतमालाच्या वाजवी भावाला कायदेशीर हमी देण्याची आणि बटाईदार व महिला शेतकऱ्यांना संस्थात्मक पतपुरवठ्याची कायदेशीर ओळख देण्याची अत्यंत महत्त्वपूर्ण शिफारस केली होती. आयोगाच्या शिफारशींवर आधारित ङ्गराष्ट्रीय शेतकरी धोरण २००७फ प्रसिद्ध झाले खरे, परंतु ते केवळ एक धोरणात्मक दस्तऐवज राहिले; त्याला कोणताही कायदेशीर आधार दिला गेला नाही. आजतागायत स्वामिनाथन आयोगाच्या या मुख्य शिफारशी कागदावरच धूळ खात पडून आहेत आणि त्यामुळेच देशात शेतकरी आंदोलनांचा व अस्वस्थतेचा वणवा कायम पेटलेला दिसतो.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!

दिसेल तिथं ठोकणारच, भर चौकात...रुपाली पाटील प्रचंड संतापल्या, सुशील कुलकर्णींना थेट इशारा!

■ ठाणे/वृत्तसंस्था

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनी काही दिवसांपूर्वी काही ऑडिओ क्लीप बाहेर काढल्या. या ऑडिओ क्लीपमध्ये मनोज जरांगे यांचा जनाधार संपवण्याबाबत तसेच 500 कोटी रुपयांचा उल्लेख आहे. या क्लीपमधील आवाज हा भाजपा नेत्यांचा आहे, असा दावा शिंदे गटाच्या काही महत्त्वाच्या नेत्यांनी केलाय. तर दुसरीकडे या ऑडिओ क्लीपचा भाजपाशी काहीच संबंध नाही, असं भाजपाने स्पष्ट केलंय. जरांगे यांनी समोर आणलेल्या अशाच एका ऑडिओ क्लीपमधील आवाज हा सुशील कुलकर्णी यांचा असल्याचा खळबळजनक दावा केला जातोय. ते एक यूटयूबर आहेत. आता याच यूटयूबर सुशील कलकर्णी यांना रुपाली ठोंबरे यांनी थेट इशाराच दिलाय. तू एकदम नीच नीघाला. दिसेल तिथे ठोकणारच, असा सज्जड दमच ठोंबरे यांनी दिलाय.रुपाली पाटील ठोंबरे यांनी त्यांच्या फेसबुक पेजवर एक पोस्ट केली आहे. याच पोस्टमध्ये त्यांनी सुशील कुलकर्णी यांच्याविषयी आपले मत व्यक्त केले आहे. अतिशय तिखट शब्दांत त्यांनी ही प्रतिक्रिया दिलीय. सुशील जिथे दिसतील तिथे मी त्यांना ठोकणार असा थेट इशारा त्यांनी दिलाय. "सुशील बापूसाहेब रेणापूरकर उर्फ कुलकर्णी यांनी राजकारणाचा चिखल केलाय राव. पळतोस कुठे हिशोब अपूर्ण राहिलाय..तुला भर चौकात रणरागिणीचा प्रसाद दिल्याशिवाय सुट्टी नाही," असा सज्जड दमच त्यांनी दिलाय. सोबतच तू तर एकदम नीच निघाला..दिसेल तिथे तुला ठोकणारच...नीच माणूस, असा थेट इशाराच ठोंबरे यांनी दिलाय.ही पोस्ट करताना रुपाली ठोंबरे पाटील यांनी एक फोटो पोस्ट केलाय. या फोटोमध्य सुशील कुलकर्णी नावाच्या व्यक्तीने व्हॉट्सॲपवर एक स्टेटस ठेवल्याचे दिसतेय. या स्टेटसमध्ये 'प्रवास थांबतोय. निघालो माघारी. सगळ्यांना शुभेच्छा' असे लिहिलेले दिसतेय. सुशील कुलकर्णी यांचेच हे स्टेटस असल्याचे म्हटले जातेय. याच स्टेटसचा आधार घेऊन रुपाली पाटील ठोंबरे यांनी सुशील कुलकर्णी यांना इशारा दिलाय. त्यामुळे आता आगामी काही दिवसात नेमके काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, मनोज जरांगे यांच्यासाठीच्या षडयंत्रकारी बैठकीत मी नव्हतो, असे स्पष्टीकरण सुशील कुलकर्णी यांनी दिलेले आहे.

दिपके यांना मोठा धक्का, राजकीय कारकीर्द संपली, माजी न्यायाधीशांनी..

■ अहिल्यानगर/वृत्तसंस्था

कोकरोच जनता पार्टीचे दिल्लीतील ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील आंदोलन दिल्ली पोलिसांनी उधळून लावले. सीजेपीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने दिल्लीत दाखल झाले. मात्र, दिल्ली पोलिसांनी त्यापूर्वीच दिल्ली विमानतळावरून अभिजीत दिपके, सौरभ दास आणि आशुतोष रोका यांना ताब्यात घेतले. अभिजीत दिपके, सौरभ दास आणि आशुतोष रोका यांच्यासह अजिंक्य शिंदे यांच्याकडून पोलिसांनी पीस बॉन्ड सही करून घेतला. त्यातच आता सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायाधीश सोशल मीडियावर तुफान चर्चेत आहेत. सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायाधीश मार्कंडेय काटजू यांनी सीजेपीच्या या तिन्ही नेत्यांवर निशाणा साधला. हेच नाही तर यांचे करिअर संपल्याचेही मोठे विधान त्यांनी केले. काटजू यांनी थेट नेहा बोरा हिचे कौतुक केले.पीस बॉन्डवर सही करण्यास तिने नकार दिल्याचे त्यांनी म्हटले. त्यांनी म्हटले की, मी नेहा बोरा हिचे खरोखरच कौतुक करतो. मार्कंडेय काटजू यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत लिहिले की, कोकरोच जनता पार्टीच्या टॉप चार नेत्यांनी अभिजीत दिपके,सौरभ दास, आशुतोष रोका आणि अजिंक्य रहाणे या सर्वांनी पीस बॉन्डवर सही केल्या. यानुसार, हे स्पष्ट झाले की, ते कोणत्याही प्रकारच्या आंदोलनात सहभागी होऊ शकत नाहीत. जर पोलिसांनी म्हटले की, यांनी शांती भंग केली आणि बॉन्ड मोडला आहे तर त्यांना अटक करून जेलमध्ये टाकले जाऊ शकते. काही दिवस जेलमध्ये राहण्याची वेळ त्यांच्यावर येऊ शकते. सुप्रीम कोर्टाच्या माजी न्यायाधीशांनी म्हटले की, त्यांच्या या निर्णयाने त्यांचे करिअर संपले आहे. बॉन्ड सही केल्याने त्यांच्या करिअरला धक्का बसला. अभिजीत दिपके यांच्यासह तिनही नेत्यांचे करिअर जवळपास संपले आहे.त्यांनी पुढे म्हटले की, मी फक्त नेहा बोरा हिचे कौतुक करतो. तिने पीस बॉन्डवर सही करण्यास नकार दिला. तिने म्हटले की, शांतीपूर्ण आंदोलन करणे हा तिचा अधिकार आहे. आशुतोष रोका आणि सौरभ दास यांना 50-50 हजारांच्या बॉन्डवर सोडण्यात आले. जामीन मिळाल्यानंतर त्यांनी दुसऱ्याच दिवशी जंतरमंतरवर शिरून आंदोलन करण्याचा प्रयत्न केला.

घरवापसीबद्दल मी कुठे बोललो का? अशोक चव्हाण

मुंबई : अशोक चव्हाण घरवापसी करणार आहेत का? या प्रश्नावर नाना पटोले यांनी प्रतिक्रिया दिली होती. नाना पटोले म्हणाले होते की, महत्वाच्या काळात अशोक चव्हाण काँग्रेस सोडून गेले होते, त्यामुळे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये रोष आहे. पण अशोक चव्हाण यांच्या प्रवेशाचा निर्णय शेवटी पक्षश्रेष्टी घेतील असेही पटोले म्हणाले होते.

त्यावर अशोक चव्हाण यांना विचारले असताना ते संतापले आणि त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. आपण कधी काँग्रेस प्रवेशाबाबत बोललो का? एक पुरावा मला दाखवा असेही चव्हाण यांनी म्हटले आहे.अशोक चव्हाण हे आदर्श घोटाळ्यात नाव आल्यानंतर भाजपाच्या आश्रयाला आले. त्यांचे वडिल शंकरराव चव्हाण हे काँग्रसेचे दिग्गज नेते होते. त्यांनी महाराष्ट्राचे दोनदा मुख्यमंत्री पद भूषवले होते. तर केंद्रातही ते मंत्री होते. शंकरराव चव्हाण यांनी नांदेडचे नगराध्यक्ष ते मुख्यमंत्री, केंद्रिय मंत्री असा प्रवास केला होता. १९७२ ते ७७ पर्यंत ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर पुन्हा ते १९८६ ते १९८८ या काळात दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले होते. त्याचे पूत्र अशोक चव्हाण हे २००८ ते २०१० पर्यंत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर ते आदर्श घोटाळ्यात अडकल्यानंतर त्यांना पायउतार व्हावे लागले.

अवैध धंदे सुरु राहतात, मग अजितदादांच्या पुतळ्यासाठी परवानगीचा अडथळा कशाला?

■ जळगाव/वृत्तसंस्था

जळगावात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या लोकार्पणाचा कार्यक्रम पार पडला. मात्र या पुतळ्याच्या उभारणीसाठी आलेल्या शासकीय अडचणींवरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे आमदार अनिल पाटील यांनी सरकारला घरचा आहेर दिला आहे. पुतळा उभारताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. या प्रक्रियेदरम्यान काही नकोशा गोष्टीही समोर आल्याचे सांगत त्यांनी शासकीय यंत्रणेच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित केले.जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत दिवंगत अजितदादा पवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाला मंत्री गुलाबराव पाटील, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. स्थानिक शिवसेना शिंदे गटाचे, भाजपचे आमदार आणि सर्वपक्षीय नेत्यांनीही कार्यक्रमाला हजेरी लावली. छत्रपती संभाजी महाराज नाट्यगृहात झालेल्या कार्यक्रमात उपस्थित मंत्री आणि आमदारांनी अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला.पुतळा उभारण्यासाठी आलेल्या अडचणींबाबत बोलताना आमदार अनिल पाटील यांनी काही शासकीय अधिकाऱ्यांनी पुतळा बसवण्याच्या प्रक्रियेत अडथळे आणण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. एखाद्या पुतळ्यासाठी परवानगी मिळवताना जवळपास वर्षभराचा कालावधी लागतो, असेही त्यांनी सांगितले. परवानगीसाठी लागणारा विलंब आणि कागदपत्रांची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सरकारने पुढाकार घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी अनिल पाटील यांनी अवैध धंद्यांचाही मुद्दा उपस्थित केला. सट्टा, पत्ता आणि दारू यांसारख्या अवैध धंद्यांना अधिकृत परवानगी नसतानाही ते सुरू राहतात; मग अशा गोष्टींवर नियंत्रण कसे ठेवले जाते, असा सवाल त्यांनी केला. अजितदादांसारख्या नेत्याचा पुतळा उभारतानाही अडचणी येत असतील, तर विरोधाचा सामना करावा लागला तरी आम्ही मागे हटणार नाही, असा निर्धार अनिल पाटील यांनी व्यक्त केला.

रामदास कदम यांचा एकनाथ शिंदेंना फोन, थेट मोठा आरोप; म्हणाले, आपला कोण..

■ मुंबई/वृत्तसंस्था

मनोज जरांगे पाटील यांनी 500 कोटींचा बॉम्ब फोडल्याने राज्यात एकच खळबळ उडाली आहे. जरांगे पाटील यांनी एक क्लिप व्हायरल करून हा गौप्यस्फोट केला. त्यामुळे शिंदे गट चांगलाच अडचणीत आला होता. शिंदे गटाकडून रामदास कदम यांनी जरांगे यांना प्रत्युत्तर दिलं होतं. त्यामुळे जरांगे आणि कदम यांच्यात चांगलीच जुंपली होती. त्यानंतर रामदास कदम पक्षात एकाकी पडल्याचं चित्र निर्माण झालं होतं. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कदम यांना फोन करून शांत राहण्यास सांगण्यात आलं होतं. आता परत रामदास कदम यांनी एकनाथ शिंदे यांना फोन करून आपल्याच पक्षातील नेत्यांनी या प्रकरणात कच खाल्ली, असा आरोपच केला आहे.रामदास कदम यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे खंत व्यक्त केली आहे. कथित ऑडिओ क्लिप संदर्भात आपल्या अनेक नेत्यांनी आक्रमकपणे भूमिका मांडली नाही. ज्या पद्धतीने मी पक्षाची बाजू मांडली तशी कोणत्याही नेत्याने मांडली नाही. आपलं कोण? आणि त्यांचं कोण? हे वेळीच ओळखलेलं बरं, असे रामदास कदम यांनी एकनाथ शिंदेना सांगितल्याचं सूत्रांनी सांगितलं.मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेऊन मनोज जरांगे यांच्यावर हल्ला चढवला होता. रामदास कदम यांच्याकडे त्या क्लिपची तारीख कुठून आली? त्यांना ही तारीख कशी समजली? पूर्ण क्लिप ऐकवण्याऐवजी कदम फक्त शिंदेवरील आरोपाचा भागच का ऐकवतात? यामागे रामदास कदम यांचा हेतू काय? कोण एकनाथ शिंदेंची बदनामी करत आहे? मी शिंदेंची बदनामी केली नाही. रामदास कदम यांनीच शिंदेंची बदनामी केली. माझ्या आधी त्यांनीच ही क्लिप व्हायरल केली. माझ्याकडून तर तो विषय संपलाच होता, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं होतं.माझ्याकडून गृहमंत्रालयाने, फडणवीस आणि शिंदेंनी क्लिप घेण्यापेक्षा रामदास कदम यंच्याकडून घ्यावी. त्यांच्याकडे ओरिजिनल क्लिप आहे. त्यांना क्लिपची तारीख माहीत आहे. त्यांना कुणी दिली हे त्यांनाच माहीत आहे. माझ्या आधी चॅनलवर आधी क्लिप ऐकवली गेली. माझ्या आधी रामदास कदम यांनी क्लिप ऐकवली. मी दोन तासानंतर पीसी घेतली. मी एकनाथ शिंदेंना बदनाम केलं म्हणता, माझ्या आधी रामदास कदम यांनी काय केलं? ती काय शिंदेंना शाबसकी होती का? श्रीकांत भैय्यांनी 500 कोटी रुपये घेतले एवढीच क्लिप रामदास कदम यांनी ऐकवली. कोण बदनामी करतंय हे न कळण्या इतके शिंदे बोळ्याने दूध पितात का? आमच्याही कानात बिड्या आहेत काय? असा सवाल जरांगे यांनी केला होता.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!

पोर्तुगालला गेली, तिथे जाताच विकून टाकलं, लैंगिक छळ आणि... नागपूरच्या महिलेसोबत धक्कादायक प्रकार

■ मुंबई/वृत्तसंस्था

गलेलठ्ठ पगाराच्या आमिषामुळे नागपूरची एक महिला पोर्तुगालमध्ये नोकरीसाठी गेली. तिथे जाताच तिची विक्री करण्यात आली. या महिलेचा लैंगिक छळ करण्यात आला. मारहाण करण्यात आली. त्यानंतर तिच्या नवऱ्यालाही धमकावण्यात आलं. अचानक घडलेल्या प्रकारामुळे ही महिला आणि तिचे कुटुंबीय हादरून गेले आहेत. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत या प्रकरणी आंतरराष्ट्रीय मानवी तस्करीचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.नागपूरमधील ही 28 वर्षीय महिला आहे. तिला दीड लाख रुपये पगार देण्याचं अमिष दाखवण्यात आलं होतं. पुण्याच्या एका कन्सल्टंट एजन्सीने हे अमिष दाखवलं होतं. सुपरमार्केटमध्ये नोकरी देण्याऐवजी पोर्तुगालमधील बिअर शॉप मालकाला महिलेला विकल्याचा धक्कादायक आरोप आहे. त्यामुळे ही महिला पोर्तुगालला गेली. पण तिथे तिला बियर शॉपच्या मालकाला विकण्यात आलं. तिच्याकडून तिथे जबरदस्तीने काम करून घेण्यात आलं. तिचं शारीरिक आणि मानसिक शोषणही करण्यात आलं. मालकाच्या घरी ठेवून तिचं लैंगिक शोषण केल्याची तक्रार आहे. 'तुला खरेदी करण्यासाठी भारतातील एजंटना पैसे दिले आहेत', असं बिअर शॉप मालकाने सांगितल्याचा महिलेचा दावा आहे.ही महिला इन्स्टाग्रामच्या माध्यमातून पुण्यातील एका कन्सल्टन्सीच्या संपर्कात आली होती. तिला कंपनीच्या लोकांनी पोर्तुगालमध्ये कॅशियरची नोकरी देण्याचं आमिष दाखवलं. महिन्याला दीड लाख रुपये पगार मिळेल आणि आठ तासाची नोकरी राहील असंही सांगितलं. त्यामुळे ही महिला आणि तिच्या घरातील लोक खूश झाले. आता घरातील आर्थिक चणचण संपेल असं त्यांना वाटू लागलं. एवढं मोठं पॅकेज मिळतंय म्हटल्यावर सदर महिला ही कंपनीच्या जाळ्यात आली. व्हिसा आणि इतर कागदपत्र तयार करण्याच्या नावाखाली या महिलेकडून टप्प्या टप्प्याने 11 लाख रुपये वसूल करण्यात आले.पण ही महिला पोर्तुगालला गेल्यावर कहाणी संपूर्णपणे बदलून गेली. महिला पोर्तुगालला जाताच एजंटांनी तिचा पासपोर्ट हिरावून घेतला. त्यानंतर तिला दोन दिवस एका खोलीत बंद करून ठेवलं. त्यानंतर या महिलेला बियर शॉपच्या मालकाला विकलं. तिथे तिच्याकडून जबरदस्तीने काम करून घेण्यात आलं. या महिलेने त्याला विरोध केल्यावर तिला मारहाण करण्यात आली. तिचं शारीरिक आणि मानसिक शोषण करण्यात आलं.महिलेने त्यांना पासपोर्ट मागितल्यावर आरोपींनी तिच्याकडे पैशाची मागणी केली. एक महिनाभर हा अत्याचार सहन केल्यानंतर या महिलेला तिथून निसटण्याची संधी मिळाली. तिथून निसटताच आधी ती पोर्तुगालहून बसने लिस्बनला गेली. नंतर मॅड्रिडला आली. त्यानंतर ती दोहा मार्गे कशी तरी भारतात पोहोचली.भारतात पळून आल्यावरही तिची ससेहोलपट संपली नाही. कन्सल्टन्सीशी संबंधित लोकांनी तिला पुन्हा तीन लाख रुपये मागितले. तिला परत माल्टामध्ये नोकरी देण्याचं अमिष दाखवलं. तिने पैसे देण्यास नकार दिल्यावर तिच्या नवऱ्याला जीवे मारण्याची धमकी दिली. महिलेला खोट्या केसेसमध्ये अडकवण्याची धमकी दिली. त्यानंतर या महिलेने वैतागून पोलिसांमध्ये तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी या कन्सल्टन्सीच्या संचालकासहीत 8 जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या आरोपींवर मानवी तस्करी, फसवणूक आणि जबरदस्तीने पैसे वसूल करण्याचे आरोप करण्यात आले आहेत. पोलीस सध्या आरोपींचा शोध घेत आहेत.

गुंगीचे औषध देऊन पतीवर जीवघेणा हल्ला, नंतर जिवंत गाडण्याचा प्रयत्न; बारामतीत खळबळ

■ वसई/वृत्तसंस्था

गेल्या काही काळापासून गुन्हेगारीच्या प्रमाणात झपाट्याने वाढ झाली आहे. अशातच आता बारामती शहरातील एका धक्कादायक प्रकरणाने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पतीला गुंगीचे औषध देऊन अर्धबेशुद्ध केल्यानंतर त्याच्यावर बॅटने हल्ला करून घरातच बांधलेल्या चौकोनी कट्ट्यात पुरण्याचा कथित प्रयत्न झाला आहे. याबाबतची तक्रार बारामती शहर पोलिसांकडे दाखल झाली आहे. या प्रकरणी पत्नीविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. बारामतीतील या घटनेप्रकरणी प्रकाश कान्होबा जगताप (वय 71, रा. ढाकाळे, ता. बारामती) यांनी बारामती शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार त्यांची सून शर्मिला प्रविण जगताप (वय 38, रा. इंद्रप्रस्थ सोसायटी, जामदार रोड, बारामती) हिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम 109(1) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता पुढील तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

फिर्यादीनुसार, 30 जुलैच्या रात्रीपासून 1 ऑगस्टच्या सकाळीदरम्यान हा प्रकार घडला. आरोपी महिलेने तिचे पती प्रविण प्रकाश जगताप (वय 41) यांना गुंगीचे औषध देऊन अर्धबेशुद्ध केले. त्यानंतर बॅटने मारहाण करून त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, हल्ल्यानंतर जखमी व बेशुद्ध अवस्थेतील प्रविण जगताप यांना घरातील हॉललगतच्या गॅलरीत बांधलेल्या चौकोनी कट्ट्यात ठेवून त्यावर फरशी बसवून पुरण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, हा कथित कट उघडकीस आल्यानंतर प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचले.तक्रारीच्या आधारे बारामती शहर पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक शशिकांत इंगवले करत आहेत. जखमी प्रविण जगताप यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून घटनेमागील नेमके कारण, पुरावे आणि सर्व परिस्थितीचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासाअंतीच स्पष्ट होणार असून, शहरात या घटनेची मोठी चर्चा सुरू आहे.

ऑफिसमधील वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून महिलेचा टोकाचा निर्णय

■ नागपूर/वृत्तसंस्था

कर्नाटकच्या म्हैसूरमधून धक्कादायक घटना घडली आहे. म्हैसूरच्या हिंकलमध्ये शुक्रवारी एका 45 वर्षीय महिलने राहत्या घरात आत्महत्या केली आहे. नागेश्वरी असे महिलेचे नाव आहे. पती अशोक यांनी वारंवार नागेश्वरीला फोन केला, परंतु त्यांचा फोन नागेश्वरीने उचलला नाही. त्यानंतर तातडीने घरी पोहोचले. त्यावेळी घरात एका बाजूला नागेश्वरी आढळून आली. त्यानंतर तिला रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी मृत घोषित केले.नागेश्वरीने आत्महत्या केल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घरी धाव घेतली. त्यावेळी घरात तपासादरम्यान तिने आत्महत्यापूर्वी लिहिलेली चिठ्ठी आढळली. यात तिने काम करत असलेल्या ऑफिसवर गंभीर आरोप केले आहेत. ती एका सुपरमार्केटमध्ये काम करत होती. ती या कंपनीत गेल्या अनेक वर्षांपासून काम करत होती. परंतु तिला अनेक त्रासाला सामोरे जावे लागत होते. तिने या चिठ्ठीत डॉली नावाच्या सुपरवायझरवर मानसिक छळ केल्याचा आरोप केला आहे. तिने आठवड्याची सुट्टी आणि चुका न करताही छळले जात आहे, असा आरोप चिठ्ठीत केला आहे.नागेश्वरीने चिठ्ठीतून बेकायदेशीररित्या कामावरून काढून टाकल्याचाही आरोप केला आहे. आजारी असताना दोन-तीन दिवस कामावर न आल्याने कामावरून काढून टाकल्याचा आरोप केला आहे.

या वागणुकीला कंटाळून आत्महत्या करत असल्याचे तिने चिठ्ठीत म्हटलं आहे. सध्या पोलिसांनी ही चिठ्ठी जप्त केली आहे. आता पोलीस आरोपी आणि इतर संबंधित माहितीचा तपास घेत आहे. या घटनेने नागेश्वरीचे पती अशोक यांना मोठा धक्का बसला आहे. या घटनेनंतर अशोक यांनी संबंधित सुपरमार्केट आणि आरोपींवर कडक कारवाईची मागणी केली आहे. नागेश्वरीच्या आत्महत्येने राहत असलेल्या परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पुणे होतंय गुन्ह्यांचं माहेर घर... PG मध्ये राहणाऱ्या तरुणाची हत्या, तर तरुणी गंभीर जखमी

■ पुणे/वृत्तसंस्था

विद्येचे माहेरघर म्हणून पुणे शहराची ओळख होती, पण आता वाढत्या गुन्हेगारीच्या घटना पाहता पणे गुन्ह्यांचं माहेर घर होतंय का? असा प्रश्न पुन्हा उपस्थित होत आहे.पुण्यात अनेक महिलांवर अत्याचार झाल्याच्या घटना समोर आल्या, आता भरदिवसा PG मध्ये राहत असलेल्या तरुणाची हत्या झाली असून तरुणी गंभीर जखमी असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. PG मध्ये असलेल्या सीसीटीव्ही फुटेजमुळे घडलेली घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तरुणीवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु असून, प्रेमाच्या त्रिकुटामुळे मोठी घटना घडल्याचं तपासात समोर आलं आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.संबंधित घटना पुणे येथील हिंजवडी भागात घडली आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, हिंजवडी स्थित सात मजल्यांच्या PG मध्ये गेल्या चार महिन्यांपासून सागर गायकवाड मॅनेजर म्हणून काम करत होता... बुधवारी रात्री एक तरुणी एका महिन्यासाठी त्याच PG मध्ये राहण्यासाठी आलेली. तरुणीने PG संचालकाला सांगितलं की, 'सागर माझा बॉयफ्रेंड आहे...', त्यामुळे तिच्या राहण्याची व्यवस्था तिसऱ्या मजल्यावर करण्यात आली. PG मधील 310 नंबरच्या खोलीत तरुणीला राहण्यासाठी जागा मिळाली.त्यानंतर दुसऱ्या दिवशी दिनेश महादेव झांबरे नावाचा तरुण PG मध्ये आला. दिनेश याने सांगितलं, सागर याला भेटायचं आहे... आणि तिची प्रेमिका देखील येथेच राहते, PG मधील कर्मचाऱ्याने सांगितलं की, सागर तिसऱ्या मजल्यावर राहत आहे. त्यानंतर दिनेश स्वतः तिसऱ्या मजल्यावर पोहोचला. तो पोहोचल्यानंतर, काही वेळातच ओरडण्याचा आवाज येऊ लागला... जेव्हा घटनास्थळी लोकांची गर्दी जमली, तोपर्यंत उशीर झालेला. सागर जमिनीनर रक्तबंबाळ अवस्थेत पडलेलाय. दिनेश याने सागर याच्यावर लोखंडी रॉडने वार केले. कथित आरोपीने तरुणीवर देखील जीवघेणा हल्ला केला. सुरुवातीच्या तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, दिनेश आणि तरुणी शाळेत असल्यापासून एकमेकांच्या संपर्कात होते. दोघांमध्ये प्रेमसंबंध असल्याची माहिती देखील समोर येत आहे. त्यानंतर दोघे बीसीएचं शिक्षण घेण्यासाठी पुण्यात आले. पुण्यात आल्यानंतर तरुणी आणि सागर यांच्यातील संबंध रिलेशनशिपपर्यंत पोहोचले... पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याच कारणामुळे कथित आरोपीने असं कृत्य केलं. घडलेल्या घटनेत सागर याची हत्या झाली असून तरुणी गंभीर जखमी आहे. तिच्यावर उपचार सुरु आहे. सीसीटीव्ही फुटेजमुळे घटनेचं रहस्य समोर आलं. प्राथमिक तपासानुसार, आरोपीने सागरवर लोखंडी सळईने 13 ते 14 वेळा सपासप वार केले. पोलीस त्या फुटेजच्या आधारे तपास करत आहेत. पोलिसांनी दिनेश महादेव झांबरे या आरोपीला अटक केल्याची माहिती देखील समोर येत आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!

मायकल हसींसह 5 कोचिंग सदस्यांची एक्झिट, CSK च्या कोचिंग स्टाफमध्ये मोठी उलथापालथ

■ नागोया/वृत्तसंस्था

आयपीएल २०२७ च्या आधी चेन्नई सुपर किंग्सच्या कोचिंग स्टाफमध्ये मोठा बदल झाला आहे. फ्रँचायझीने सोशल मीडियावर जाहीर केले की, फलंदाजी प्रशिक्षक मायकल हसी यांच्यासह कोचिंग स्टाफमधील पाच सदस्य संघातून बाहेर पडले आहेत. चेन्नईने २०२६ च्या हंगामानंतर मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांच्याशीही संबंध तोडले आहेत. त्यांच्या जागी भारताचा माजी वेगवान गोलंदाज झहीर खान याची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.आता फ्लेमिंगनंतर चेन्नईच्या कोचिंग स्टाफमधून आणखी पाच अनुभवी खेळाडूंना हटवण्यात आले आहे. त्या पोस्टमध्ये सर्वप्रथम मायकल हसी यांचे आभार मानत लिहिले होते की, २००८ मधील पहिल्या हंगामापासून, तुम्ही चेन्नई सुपर किंग्स परिवाराचा एक अविभाज्य भाग राहिला आहात. पिवळ्या जर्सीतील तुमचा प्रवास केवळ तुम्ही केलेल्या धावा किंवा तुम्ही घडवलेल्या खेळाडूंमुळेच

नव्हे, तर तुम्ही या फ्रँचायझीला वर्षानुवर्षे दिलेल्या समर्पण, नम्रता आणि अढळ वचनबद्धतेमुळेही ओळखला जातो. आमच्या इतिहासात तुमचे स्थान नेहमीच विशेष राहील, हँसमिस्टर.गोलंदाजी प्रशिक्षक एरिक सायमन यांच्या निरोपाच्या पोस्टमध्ये म्हटले आहे, २०१८ पासून चेन्नई सुपर किंग्सच्या प्रशिक्षण चमूचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या एरिक सायमन यांनी आमची गोलंदाजी फळी उभारण्यात आणि गेल्या काही वर्षांपासून संघाच्या यशात मोलाची भूमिका बजावली आहे. तुमच्या समर्पित सेवेबद्दल आणि योगदानाबद्दल आम्ही मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. धन्यवाद, एरिक सायमन. तुमच्या पुढील वाटचालीस अभिनंदन. आगामी हंगामात मोहित शर्मा संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक असणार आहे.संघाचे सहाय्यक प्रशिक्षक राजीव कुमार यांच्याविषयी असे लिहिले होते की, चेन्नई सुपर किंग्सच्या प्रशिक्षण चमूचे एक प्रमुख सदस्य म्हणून राजीव कुमार यांनी गेल्या काही वर्षांपासून संघाच्या तयारी, विकास आणि कामगिरीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. खेळाडूंसोबत जवळून काम करण्याची तुमची निष्ठा, तुमचे कौशल्य त्यांना देणे आणि संघाचा पाया मजबूत करणे हा आमच्या प्रवासाचा एक महत्त्वाचा भाग राहिला आहे. धन्यवाद, राजीव कुमार. भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा.

संघाचे फिजिओ टॉमी सिमसेक यांच्याविषयी असे लिहिले होते, २००८ मधील आमच्या पहिल्या हंगामापासून पडद्यामागे सातत्याने उपस्थित असलेल्या टॉमी सिमसेक यांनी चेन्नई सुपर किंग्सच्या प्रवासात अमूल्य भूमिका बजावली आहे. आमच्या खेळाडूंना ज्यात आमच्या पूर्वीच्या प्रसिद्ध 'डॅड्स आर्मी'चाही समावेश आहे. तंदुरुस्त आणि सामन्यासाठी सज्ज ठेवण्याप्रती असलेले तुमचे समर्पण, हे गेल्या अनेक वर्षांतील आमच्या यशाचा एक महत्त्वाचा भाग आहे. टॉमी सिमसेक, तुमच्या अनेक वर्षांच्या सेवेबद्दल धन्यवाद.स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग प्रशिक्षक ग्रेग किंग यांनी लिहिले, प्रत्येक यशस्वी मोहिमेमागे तयारीचे अगणित तास, शिस्त आणि कठोर परिश्रम दडलेले असतात. ग्रेग किंग, स्ट्रेंथ अँड कंडिशनिंगमधील तुमच्या कौशल्याने आमच्या सुपर किंग्सना शारीरिक आव्हानांवर मात करण्यास आणि प्रत्येक हंगामात उत्कृष्ट कामगिरी करण्यास मदत केली आहे. ग्रेग किंग, 'यलो आर्मी'साठी तुम्ही जे काही केले आहे, त्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत.

रणजीच्या पहिल्याच सामन्यात त्याने कमाल केली, कोण आहे सक्षम पुरोहित ?

■ इंदूर/वृत्तसंस्था

डेब्यू मॅच मध्ये पहिल्या दिवसाचा खेळ संपताना सक्षम पुरोहितने 166 चेंडूत नाबाद 113 धावा ठोकल्या. सक्षम चंबळचा राहणारा आहे. या खेळाडूने पहिल्याच सामन्यात आपली क्षमता दाखवून दिलीय. सक्षम बद्दल काही खास गोष्टी जाणून घेऊया.एकवेळ चंबळचं खोरं हे डाकूंसाठी प्रसिद्ध होतं. चंबळच्या खोऱ्यावर डाकूंवर आधारित अनेक हिंदी सिनेमेही आहेत. आता याच चंबळमधून यशस्वी क्रिकेटपटू बाहेर येत आहेत. सक्षम पुरोहित त्याचं उत्तम उदहारण आहे. हा विकेटकीपर फलंदाज चंबळ मध्ये लोकप्रिय आहे. सक्षमचे वडिल जितेंद्र पुरोहित एक शिक्षक आहेत. वयाच्या 12 व्या वर्षापासून सक्षम क्रिकेट अकादमीत जायचा. चौधरी दिलीप सिंह ली कॉलेज ग्राऊंडवर कोच रवी शखेर कटारे यांच्याकडे सक्षमने क्रिकेटचे धडे गिरवले.सक्षम मध्य प्रदेशच्या अंडर 14, अंडर 16, अंडर 19 आणि अंडर 23 टीमकडून खेळलाय. कर्नल सी के नायडू ट्रॉफीमध्ये तो मध्य प्रदेशचा कर्णधारही होता. मध्य प्रदेश टी20 लीगमध्ये तो मालवा स्टॅलियन्सकडूनही खेळला. अलीकडेच अंडर 23 मध्ये पंजाब विरुद्ध मध्य प्रदेशचं नेतृत्व केलं. 165 धावा ठोकल्या. चंदीगड विरुद्ध त्याने 130 रन्स केल्या. या प्रदर्शनाच्या आधारावर सक्षमला मध्य प्रदेशच्या रणजी टीममध्ये स्थान मिळालं. त्याने आता पहिल्याच सामन्यात शतकी खेळी केलीय.चंदीगडच्या मैदानावर हिमाचल प्रदेश विरुद्ध सुरु असलेल्या सामन्यातही चंदीगडचे ओपनर्स शानदार इनिंग खेळले. नेहल पजनीने नाबाद 126 धावा केल्या. अर्जुन आझादने 147 धावा केल्या. मनन वोहराने 61 धावा केल्या. झारखंड विरुद्ध दिल्लीचा कॅप्टन आयुष बदोनी सुद्धा शानदार शतकी इनिंग खेळला. मुंबईकडून मुशीर खान आणि अंगकृष रघुवंशीने सेंच्युरी झळकवली. रघुवंशीचं रणजीमधलं हे पहिलं शतक आहे.

IPL 2027 च्या रिटेंशनची डेडलाइन समोर! संघांना खेळाडूंची यादी कधी जाहीर करावी लागणार ?

■ मडगाव/वृत्तसंस्था

इंडियन प्रीमियर लीगच्या २० व्या हंगामासाठी म्हणजेच आयपीएल २०२७ साठी सर्व संघांनी तयारी सुरू केली आहे. आगामी हंगामासाठीचा लिलाव १६ डिसेंबर रोजी गोव्यात होणार आहे. लिलावापूर्वी सर्व १० संघांना कायम ठेवलेल्या आणि मुक्त केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागेल. कायम ठेवलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करण्याची अंतिम मुदत जाहीर करण्यात आली आहे.सर्व १० आयपीएल संघांना १५ नोव्हेंबर २०२६ पूर्वी त्यांच्याद्वारे मुक्त केलेल्या आणि कायम ठेवलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करणे बंधनकारक आहे. यावेळी अनेक प्रमुख खेळाडूंना मुक्त केले जाण्याची शक्यता आहे. खेळाडूंच्या अदलाबदलीची सेधी अजूनही खुली आहे. परिणामी अनेक संघांनी खेळाडूंची अदलाबदल करण्याच्या या संधीचा फायदा घेतला आहे. ऋषभ पंत लखनौ सुपरजायंट्स सोडून दिल्ली कॅपिटल्समध्ये गेला आहे. तर कुलदीप यादव दिल्ली सोडून लखनौमध्ये आला आहे आयपीएल ट्रेड विंडो लिलावाच्या एक आठवडा आधीपर्यंत खुली राहते. लिलावानंतर एका आठवड्याने ही विंडो पुन्हा उघडते. हंगाम सुरू होण्याच्या अंदाजे एक महिना आधीपर्यंत खुली राहते.

हार्दिक पांड्यापासून ते अभिषेक शर्मा, यशस्वी जैस्वाल आणि सॅम करनपर्यंतच्या खेळाडूंच्या ट्रेडच्या अफवा पसरल्या आहेत. आतापर्यंत केवळ दोनच यशस्वी ट्रेड झाले असून त्यातून चार खेळाडूंची अदलाबदल झाली आहे.आयपीएल २०२७ च्या लिलावापूर्वी अनेक प्रमुख खेळाडूंना संघातून मुक्त केले जाण्याची शक्यता आहे. मुंबई इंडियन्स सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पांड्या यांसारख्या स्टार खेळाडूंना संघातून मुक्त करू शकते. दिल्ली कॅपिटल्स करुण नायर, पृथ्वी शॉ, रेहान अहमद, दुशमंथा चमीरा, काईल जेमिसन आणि आकिब नबी दार यांना संघातून मुक्त करू शकते. गुजरात टायटन्स ल्यूक वूड, राहुल तेवतिया आणि शाहरुख खान यांना संघातून मुक्त करू शकते . गतविजेता आरसीबीदेखील दोन खेळाडूंना संघातून मुक्त करू शकतो.

आयपीएल २०२७ साठी चेन्नई सुपर किंग्सला नवीन प्रशिक्षक मिळाला आहे. इंग्लंडचा माजी गोलंदाज गॅरेथ बॅटी सहायक प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहे. त्याच्या प्रशिक्षणाखाली इंग्लिश काउंटी संघ सरेने २०२२ ते २०२४ दरम्यान सलग तीन विजेतेपदे जिंकली होती. आता त्याने सीएसकेमध्ये एक नवीन भूमिका स्वीकारली आहे. तो मुख्य प्रशिक्षक झहीर खानसोबत प्रशिक्षण स्टाफचा भाग असेल

मॅचमध्ये मोठा राडा, हरिस रौफ थेट इंग्लंडच्या खेळाडूवर धावून गेला..

■ गेबेरा/वृत्तसंस्था

गद्दाफी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या चौथ्या सामन्यात इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय तिरंगी मालिकेत १ गडी राखून रोमांचक विजय मिळवत पाकिस्तानने अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. या सामन्यात, शादाब खानने हरिस रौफसोबत १०व्या विकेटसाठी विक्रमी ८९ धावांची भागीदारी रचली आणि यशस्वी एकदिवसीय धाव-पाठलागातील सर्वोच्च १०व्या विकेटच्या भागीदारीचा विक्रम प्रस्थापित केला. शादाब खानच्या शतकाने चाहत्यांची मने जिंकली, त्याचबरोबर सामन्यादरम्यान घडलेल्या एका घटनेने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले.हरिस रौफ आणि विल जॅक्स यांच्यात बाचाबाची

झाली. वास्तविक पाहता, इंग्लंडच्या सॅम करनने पाकिस्तानचा फलंदाज शादाब खानला एक बाउन्सर टाकला. हरिस रौफने वाईडसाठी पंचांकडे अपील केले, परंतु पंचांनी त्याचे अपील फेटाळले. मात्र, त्यानंतर विल जॅक्स त्याला काहीतरी म्हणाला. या तणावपूर्ण वातावरणात, विल जॅक्सच्या सूचनेमुळे रौफ चिडला आणि त्या खेळाडूशी वाद घालू लागला. पंचांना हस्तक्षेप करावा लागला. मात्र, ते दोन खेळाडू पंचांशी वाद घालू लागले. पंचांनी समजावल्यानंतर त्यांच्यातील वाढता तणाव निवळला. खेळाडू आणि पंच यांच्यातील या संवादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. एका क्षणी, पाकिस्तानने १५४ धावांवर आपली नववी विकेट गमावली. असे वाटत होते की इंग्लंड हा सामना मोठ्या फरकाने जिंकेल. मात्र, आठव्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या शादाब खानने हॅरिस रौफसोबत (७ धावा नाबाद) ८० चेंडूमध्ये दहाव्या विकेटसाठी ८९ धावांची अभेद्य भागीदारी करून संघाला एक रोमांचक विजय मिळवून दिला. शादाब ९६ चेंडूमध्ये पाच षटकार आणि १३ चौकारांसह ११३ धावांवर नाबाद राहिला. इंग्लंडकडून जेमी ओव्हरटनने सर्वाधिक तीन बळी घेतले, तर गस ऍटकिन्सन आणि लियाम डॉसन यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. हेन्री क्रोकोम्बे आणि विल जॅक्स यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

पाकिस्तानने आपले सुरुवातीचे तिन्ही सामने जिंकून अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. दरम्यान, श्रीलंकेने आपल्या दोन सामन्यांपैकी एक सामना जिंकून गुणतालिकेत दुसरे स्थान पटकावले आहे. सलग तीन सामने गमावल्यामुळे इंग्लंड तिसऱ्या स्थानावर आहे. त्यांचा सामना २९ ऑक्टोबर रोजी श्रीलंकेशी होईल. श्रीलंकेचे सध्या दोन सामने शिल्लक आहेत. अंतिम सामना ३१ ऑक्टोबर रोजी गद्दाफी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!

"घटस्फोटाचा निर्णय त्याचा होता", इम्रान खानची पहिली पत्नी स्पष्टच बोलली; म्हणाली, "आम्ही एकमेकांशी वाईट..."

बॉलीवूड अभिनेता इम्रान खान त्याला भारत सोडण्यास सांगितल्याने मागील काही दिवसांपासून चर्चेत आहे. अशातच त्याची पहिली पत्नी अवंतिका मलिकने इम्रानबरोबरच्या घटस्फोटाचं कारण सांगितलं आहे. अवंतिकाला इम्रानला भेटली तेव्हा ती अवघी १९ वर्षांची होती. काही वर्षे डेट केल्यावर २०११ साली त्यांनी लग्न केलं. तेव्हा इम्रान यशाच्या शिखरावर होता. काही वर्षांनी त्याच्या करिअरला उतरती कळा लागली आणि त्याच काळात त्यांच्या वैवाहिक आयुष्यातही वादळ आलं. शेवटी २०१९ मध्ये इम्रान खान व अवंतिकाचा घटस्फोट झाला. आता अवंतिका मलिकने लग्न, घटस्फोट यावर मोकळेपणाने भाष्य केलंय. तसेच घटस्फोटाचा निर्णय इम्रान खानचा होता, असंही नमूद केलं.

सोहा अली खानशी बोलताना अवंतिकाने सांगितलं की तिने व इम्रानने १८ वर्षे एकत्र घालवली. "या १८ वर्षांच्या काळात तुम्ही एकत्र वाढता, विकसित होता, वेगळी व्यक्ती बनता, परिपक्व होता," असं ती म्हणाली. तसेच, आपल्या मनात भावनिक ओझं होतं आणि त्याची जाणीवच नव्हती, अशी कबुलीही तिने दिली.

"अशा कोवळ्या वयात तुम्हाला स्वतःच्या आनंदाची जबाबदारी तुमचीच आहे, याची जाणीव नसते. तुम्हाला वाटतं की, 'अरे, ही व्यक्ती माझ्यासमोर आहे आणि मी आनंदी व समाधानी राहण्याची जबाबदारी त्याची आहे.' तुम्हाला जाणवतच नाही की, बरीच वर्षे तुम्ही या नात्याकडून अनपेक्षित आणि अवास्तव अपेक्षा ठेवल्यामुळे शेवटी त्या नात्याचं नुकसान करत असता," असं अवंतिका मलिक म्हणाली.

अवंतिकाने सांगितलं की तिला आयुष्यभर आनंदी राहणं या कल्पनेवर विश्वास नाही. "माझ्या आणि इम्रानच्या बाबतीत सांगायचं झाल्यास, आम्ही खूप कमी वयापासून १८ वर्षे एकत्र राहिलो. आम्ही दोघांनी आमच्या विशीत व तिशीत बऱ्याच गोष्टी पाहिल्या, अनुभवल्या. साहजिकच, या प्रवासात कुठेतरी आम्ही एकमेकांसोबत चुकीचं वागलो असं मला वाटतं. त्यामुळे घटस्फोटामागे कोणती एकच मोठी घटना कारणीभूत होती, असं म्हणता येणार नाही. मला वाटतं की लहान-लहान गोष्टी वर्षानुवर्षे साचत गेल्या," असं अवंतिका मलिक म्हणाली.

अवंतिकाने सांगितलं की, नातं टिकवण्यासाठी तिने व इम्रानने खूप प्रयत्न केले. कारण इतक्या वर्षांचं नातं अशा रितीने संपवणं सोपं नव्हतं. १८ वर्षे एकत्र घालवली, पण शेवटी दोघांनीही हे स्वीकारले की जर आपल्याला दुसरीकडे आनंद आणि समाधान मिळत असेल, तर या नात्यातून बाहेर पडणं कधीही चांगलं. "आम्ही आमचं नातं १८ वर्षे टिकवलं. अगदी लहान वयातून सुरुवात झाली. पुढे प्रसिद्धी, अपयश, यश आणि सर्व प्रकारच्या टप्प्यातून जाऊनही आम्ही ते टिकवलं. त्यामुळे प्रामाणिकपणे सांगायचं झाल्यास मला आमच्या दोघांचा अभिमान वाटतो. आमच्या नात्याचा शेवट ज्या प्रकारे झाला, त्याचं मला थोडं वाईट वाईट नाटतं, पण १८ वर्षे नातं टिकवलं हे कमी नाही, तेही एकप्रकारचं यशच आहे," असं अवंतिका मलिक म्हणाली.

अवंतिका म्हणाली, "जेव्हा आम्ही सुरुवातीला वेगळे झालो, तेव्हा तुमच्या आयुष्याबद्दल तुम्ही ज्या कल्पना केल्या असतात, त्या सगळ्या संपतात. तो तुमच्या आयुष्यातील सर्वांत सुंदर नात्याचा अंत असतो." दोघांपैकी कोणी आधी वेगळं होण्याचा विचार मांडला होता? असं विचारल्यावर अवंतिकाने इम्रान खानचं नाव घेतलं. "त्यानेच घेतला. मी कधीच तसं केलं नसतं. कदाचित मी स्वतःचं नुकसान करून घेतलं असतं, पण मी कधीच वेगळं होण्याचा निर्णय घेतला नसता. तो त्याचाच निर्णय होता." इम्रानने काही काळ एकमेकांपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आणि सहा महिन्यांनी त्यांनी घटस्फोटाचा निर्णय परस्पर संमतीने घेतला, असंही अवंतिकाने नमूद केलं. अवंतिका व इम्रानला इमारा नावाची मुलगी असून ते दोघेही तिचा सांभाळ करतात.

'फौजी' सिनेमात झळकणार सुबोध भावे!

बाहुबली सिनेमामुळे जगभरात लोकप्रिय झालेला प्रेक्षकांचा लाडका अभिनेता म्हणजेच प्रभास. २३ ऑक्टोबरला प्रभासने त्याचा ४७ वा वाढदिवस साजरा केला आणि वाढदिवसानिमित्त त्याने सर्व चाहत्यांबरोबर त्याच्या आगामी प्रोजेक्ट संदर्भातील काही महत्त्वाच्या अपडेट्स देखील शेअर केल्या आहेत. प्रभासने 'Kalki', 'सालार' या सिनेमांच्या सीक्वेलची घोषणा केली असून, त्याच्या 'फौजी' सिनेमाची पहिली झलक सुद्धा सोशल मीडियावर शेअर केली आहे.

प्रभास मुख्य भूमिकेत असलेला 'फौजी' सिनेमा सुरुवातीला डिसेंबर २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार होता. पण, आता नव्या अपडेटनुसार हा चित्रपट १९ मार्च २०२७ रोजी प्रदर्शित होणार आहे. मिथुन चक्रवर्ती, अनुपम खेर, जया प्रदा यांसारखे दमदार कलाकार 'फौजी'मध्ये प्रभाससह महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहेत. याशिवाय मराठी कलाविश्वातील प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे सुद्धा 'फौजी'मध्ये झळकणार आहे. टीझरमध्ये सुरुवातीलाच सुबोधची झलक प्रेक्षकांना पाहायला मिळते. त्याने या सिनेमात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची भूमिका साकारली आहे. सुबोध तेलुगू सिनेमात काम करण्याबद्दल म्हणतो, "प्रभास मुख्य भूमिकेत असलेल्या 'फौजी' या तेलुगू चित्रपटात सुभाषचंद्र बोस यांची भूमिका साकारण्याचं भाग्य मला लाभलं. या आगामी चित्रपटाची ही पहिली झलक... नक्की बघा आणि मला सांगा तुम्हाला कशी वाटली या सिनेमाची पहिल झलक" सुबोधला तेलुगू सिनेमात पाहून त्याच्या तमाम चाहत्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. प्रसाद जवादे, आदिनाथ कोठारे, कुंजिका काळवींट, सचित पाटील, रितिका श्रोत्री या कलाकारांनी कमेंट्स करत सुबोधला या नव्या प्रोजेक्टसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरण: 'तुमचे चेहरे टीव्हीवर आलेत, लगेच पळून जा'; बातम्या पाहून हल्लेखोरांचे सहकारी करत होते मार्गदर्शन!

अभिनेता टायगर श्रॉफच्या जुहू येथील कारवर झालेल्या गोळीबार प्रकरणात एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. १८ ऑक्टोबरच्या संध्याकाळी गोळीबार केल्यानंतर पसार झालेल्या हल्लेखोरांना पकडण्यासाठी मुंबई पोलीस प्रयत्न करत होते. मात्र, दुसरीकडे या हल्लेखोरांचे इतर सहकारी वृत्तवाहिन्यांवरील बातम्यांवर बारीक लक्ष ठेवून होते. टीव्हीवर पोलिसांच्या तपासाची माहिती जसजशी पुढे येत होती, तसतशी ती थेट हल्लेखोरांना फोन आणि मेसेजद्वारे दिली जात होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा टीव्ही चॅनेल्सवर हल्लेखोरांचे चेहरे दाखवले गेले, तेव्हा एका शूटरला त्याच्या सहकारीकडून तातडीने मेसेज आला की, "तुमचे चेहरे टीव्हीवर आले आहेत, तिथून लगेच पसार व्हा!" १८ ऑक्टोबर रोजी जुहू परिसरात टायगर श्रॉफच्या गाडीवर दुचाकीवरून आलेल्या आरोपींनी गोळीबार केला होता. या हल्ल्यात टायगर श्रॉफ थोडक्यात वाचला; मात्र त्याचा चालक आणि एक ब्लॉगर जखमी झाले. गोळीबार केल्यानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. तपासादरम्यान समोर आले की, आरोपी सातत्याने त्यांच्या वरिष्ठ हँडलर्सच्या संपर्कात होते. परदेशात किंवा इतर राज्यांत बसलेले हँडलर्स टीव्हीवरील लाईव्ह बातम्या पाहून पोलिसांचा तपास कुठपर्यंत पोहोचला आहे, याची पक्की माहिती शूटर्सना देत होते.

21व्या वर्षी पायलटशी लग्न, बॉलीवूडमध्ये येण्यापूर्वीच घटस्फोट; 25 वर्षांपासून सिंगल आहे मल्लिका शेरावत?

अनेकांची विशेष करुन तरुणांची कायम पसंती मिळवणारी मॉडेल आणि अभिनेत्री म्हणजे मल्लिका शेरावत. मल्लिकाचा आज ५०वा वाढदिवस आहे. मात्र अनेकांना माहीत नसेल की आपल्या कामामुळे सतत चर्चेत राहिलेल्या मल्लिकाचं खासगी आयुष्य काहीसं चढ-उतारांनी भरलेलं आहे. मल्लिकाचं वयाच्या २१व्या वर्षीच लग्न झालं होतं आणि मनोरंजन क्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वीच तिचा घटस्फोटही झाला होता. महत्त्वाचं म्हणजे अनेकांची आवडती असलेली मल्लिका गेल्या २५ वर्षांपासून सिंगल असल्याचं म्हटलं जातं.

मल्लिका शेरावतचा जन्म २४ ऑक्टोबर १९७६ रोजी हरियाणातील एका सामान्य कुटुंबात झाला. तिचं खरं नाव रीमा लांबा आहे. अभिनेत्रीच्या वडिलांनी एका मुलाखतीत सांगितलं होतं की, मल्लिकाला अभिनयात रस होता, मात्र तिने आयएएस अधिकारी व्हावं, अशी त्यांची इच्छा होती. मल्लिकाने अभिनय क्षेत्रात जाण्याचा निर्णय घेतल्यामुळे तिचे वडील नाराज झाले होते.

बॉलीवूडमध्ये येण्यापूर्वी मल्लिका शेरावतने एअर होस्टेस म्हणून काम केलं होतं. त्याचदरम्यान तिची भेट जेट एअरवेजमध्ये पायलट असलेल्या करण सिंग गिल यांच्याशी झाली. पुढे दोघांनी १९९७ मध्ये लग्न केलं. त्यावेळी मल्लिका २१ वर्षांची होती. मात्र, त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. २००१ मध्ये घटस्फोट घेत दोघेही वेगळे झाले. घटस्फोटानंतर मल्लिकाने बॉलीवूडमध्ये आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जीना सिर्फ मेरे लिए' या चित्रपटातून तिने पदार्पण केलं. मात्र, मुख्य अभिनेत्री म्हणून तिचा पहिला चित्रपट 'ख्वाहिश' (२००३) हा होता. या चित्रपटात किसिंग सीन्स देऊन ती अनेकांच्या चर्चेचा विषय बनली होती. त्यानंतर 'मर्डर' या चित्रपटामुळे तिला अजून लोकप्रियता मिळाली. मल्लिकाने 'प्यार के साइड इफेक्ट्स', 'डर्टी पिक्चर', 'डबल धमाल', 'पॉलिटिक्स ऑफ लव्ह', 'वेलकम', 'टाइम रेडर्स', 'द मिथ' आणि 'चिक्की विद्या का वो वाला व्हिडिओ' यांसारख्या चित्रपटांमध्येही काम केलं.

मल्लिका शेरावत अजूनही अभिनय क्षेत्रात सक्रिय आहे. अलीकडेच ती करण जोहरच्या 'द ट्रेटर्स सीझन २' या रिअॅलिटी शोमध्ये स्पर्धक म्हणून दिसली होती. तसेच, मल्लिका राजकारणी तेज प्रताप यादव यांच्याबरोबर 'भोजपुरी बवाल' या शोमध्येही दिसली होती.

***

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

पाणीटंचाईच्या प्रश्नांवर आमदार श्वेता महाले यांची यंत्रणांची विशेष आढावा बैठक; अधिकाऱ्यांना दिले आवश्यक निर्देश

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी एक लाखाची मदत; पशुधनासाठी १०५ क्विंटल चारा बियाण्यांचे वाटप

जनसंचलन/ चिखली

संभाव्य पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी चिखली विधानसभा मतदारसंघातील सर्व शासकीय यंत्रणांचा विशेष आढावा घेणारी समन्वय बैठक तहसील कार्यालय, चिखली येथे आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत ग्रामीण पाणीपुरवठा, जलजीवन मिशनची कामे, पिण्याच्या पाण्याचे स्रोत, पशुधनासाठी चारा उपलब्धता तसेच शेतकरी कुटुंबांना मदत अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी एक लाख रुपयांच्या मदतीचे धनादेश वितरित करण्यात आले. तसेच पशुधनासाठी चारा उपलब्ध व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना १०५ क्विंटल चारा बियाण्यांचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ नये, यासाठी गावनिहाय पाणीपुरवठा योजनांचा आणि उपलब्ध पाण्याच्या स्रोतांचा आढावा घेण्यात आला. कोलारा, भालगाव, आंधई, हातनी, उदयनगर, किन्होळा, ब्रह्मपुरी, महिमळ, श्रीकृष्णनगर यासह इतर गावांतील पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती, उपलब्ध जलस्रोत, त्यांची क्षमता आणि आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. उदयनगरच्या पाणीपुरवठ्याबाबत आमदारांची नाराजी उदयनगर आणि परिसरात नियमित पाणीपुरवठा होत नसल्याची बाब समोर आल्यानंतर आमदार श्वेता महाले यांनी पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांना जाब विचारत नाराजी व्यक्त केली. नागरिकांना नियमित पाणी मिळणे ही प्राथमिक जबाबदारी असून पाणीपुरवठ्यातील अडचणी तातडीने दूर करून नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.गावांत समन्वय बैठका घेऊन रखडलेल्या योजना मार्गी लावा काही गावांमध्ये स्थानिक पातळीवरील समन्वयाअभावी पाणीपुरवठ्याच्या योजना रखडल्याचे निदर्शनास आले. अशा योजना मार्गी लावण्यासाठी तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष गावांमध्ये जाऊन ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांच्या समन्वय बैठका घ्याव्यात. स्थानिक अडचणी समजून घेऊन त्यावर तोडगा काढावा आणि पाणीपुरवठ्याची कामे विनाकारण प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना आमदारांनी दिल्या. जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या गावांमधील कामांची प्रगती, पूर्ण झालेली कामे, अपूर्ण कामांची कारणे आणि कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही याबाबतही सविस्तर आढावा घेण्यात आला. ज्या गावांमध्ये कामे अपूर्ण आहेत, तेथील अडचणी दूर करून कामांना गती देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाकडून दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवश्यक उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने चिखली मतदारसंघातही प्रशासनाने आतापासूनच नियोजन करावे, असे आमदारांनी सांगितले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागासह कृषी, पशुसंवर्धन आणि पाणीपुरवठा विभागांनी समन्वयाने काम करून पिण्याचे पाणी, शेतीसाठी आवश्यक पाणी, जनावरांसाठी चारा आणि पाणीटंचाईग्रस्त गावांसाठी पर्यायी व्यवस्था यांना प्राधान्य द्यावे. गरज पडल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करून शेतकरी व नागरिकांना वेळेत मदत मिळेल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, नागरिकांना वेळेवर आणि नियमित पाणीपुरवठा व्हावा, तसेच शेतकरी आणि पशुपालकांना आवश्यक मदत मिळावी, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे.

केवळ कागदोपत्री आढावा न घेता प्रत्यक्ष परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका आमदार श्वेता महाले यांनी बैठकीत मांडली. या बैठकीला तहसीलदार विजय सवडे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रशांत बिडगर, गटविकास अधिकारी समाधान वाघ, नायब तहसीलदार मुरलीधर गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे शंतनू बोन्द्रे, कृष्णकुमार सपकाळ, ओमसिंग राजपूत, अमोल साठे, संजय महाले, बळीराम काळे, संतोष काळे पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते.

अतिवृष्टी, पूर व अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १२५ कोटींहून अधिक मदत...

१ लाख ३५ हजार शेतकऱ्यांना मिळणार लाभ - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांची माहिती

जनसंचलन/ बुलढाणा

जिल्ह्यात मार्च,जून व जुलै २०२६ या कालावधीत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे शेतजमीन व पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने मदतीचा हात पुढे केला आहे. विविध नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी शासन निर्णयानुसार एकूण १२५ कोटी ४४ लाख रुपयांहून अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे. या मदतीचा लाभ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली. मदत व पुनर्वसन विभागाने बुलढाणा जिल्ह्यात मार्च २०२६ तसेच जून व जुलै २०२६ या कालावधीत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे शेतजमीन व पिकांचे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांसाठी दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी तीन शासन निर्णय निर्गमित केले आहे. शासन निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यातील १ लाख ३५ हजार २४० शेतकऱ्यांच्या १ लाख ३५ हजार ८५४.२३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १२५ कोटी ४४ लाख ५८ हजार रुपयांची मदत जाहिर केली आहे. मार्च २०२६ मध्ये जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या १ हजार ३०६ शेतकऱ्यांच्या ९२८ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १ कोटी ५८ लाख ९ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. जून २०२६ मध्ये अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेत जमीनीच्या नुकसानीपोटी २८२ शेतकऱ्यांच्या ४८.६४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ८ लाख ७६ हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. जुलै २०२६ मध्ये अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेत जमीनीच्या नुकसानीसाठी ६ हजार ४६५ बाधित शेतकऱ्यांच्या २ हजार ३८२.८७ हेक्टर क्षेत्रासाठी १० कोटी ७७ लाख ७० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. तसेच जुलै २०२६ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी १ लाख २७ हजार १८७ शेतकऱ्यांच्या १ लाख ३२ हजार ४९४.७२ हेक्टर बाधित क्षेत्राकरिता ११३ कोटी ३ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. थेट लाभ हस्तांतरणाद्वारे मदत : शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेला निधी उपलब्ध तरतुदीतून वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. पात्र शेतकऱ्यांची माहिती विहित नमुन्यात संकलित करून संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्यात येईल. त्यानंतर प्रणालीद्वारे मदतीची रक्कम थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. मदतीची पुनरावृत्ती रोखणार : मदत वितरण करताना यापूर्वी त्याच हंगामात वितरित करण्यात आलेल्या मदतीची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. तसेच एकाच हंगामात एकाच नुकसानीसाठी विहित दरानेच मदत देण्यात यावी, लाभार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये आणि मदत वितरणाची प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करावी, असेही निर्देश आहेत. शासनाच्या निकषांनुसार मदत वितरण : मंजूर निधी संबंधित नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीसाठीच खर्च करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मदत वितरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तसेच यापूर्वी वितरित केलेल्या मदतीची बँकांकडून कर्जवसुलीसाठी वळती करण्यात येऊ नये, यासाठीही आवश्यक दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यास शासन प्राधान्य देत असून, पात्र बाधित शेतकऱ्यांपर्यंत मदतीचा लाभ वेळेत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी,

पाणी टंचाई निवारणार्थ चिखली तालुक्यातील किन्ही नाईक गावासाठी टँकर मंजूर

जनसंचलन-बुलढाणा

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील किन्ही नाईक गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली. किन्ही नाईक येथे ७०० पशुधन व २७१० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ६५ हजार २०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

धरणासाठी जमिनी आमच्या मग पाण्यासाठी प्रतीक्षा का? पेनटाकळीवर हजारो शेतकऱ्यांचा एल्गार!

तुम्ही पाणी सोडा, अन्यथा आम्ही सोडतो! आमदार सिद्धार्थ खरात यांचा इशारा; दोन दिवसांत बैठकीचे आश्वासन

जनसंचलन/मेहकर

धरणात पाणी शिल्लक असताना सिंचनासाठी आणखी किती दिवस वाट पाहायची? या सवालासह हजारो शेतकरी आणि शिवसैनिकांनी मंगळवारी, ३ नोव्हेंबर रोजी पेनटाकळी धरणावर धडक दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोर्चाने पाणी सोडण्याची मागणी लावून धरली. ङ्कतुम्ही पाणी सोडा, अन्यथा आम्ही सोडतो!फ असा इशारा देत आंदोलकांनी परिसर दणाणून सोडला. गेल्या १५ ते २० दिवसांपासून चर्चा, बैठका आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत; मात्र शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडलेले नाही, असा आरोप खरात यांनी केला. ठोस निर्णय होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली असून, त्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी शिवसेना मैदानात उतरल्याचे त्यांनी सांगितले. या धरणासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या. त्यांच्या त्यागातून धरण उभे राहिले; मग स्थानिकांच्या सिंचनाकडे दुर्लक्ष का?फ असा सवाल खरात यांनी उपस्थित केला. धरणातून चिखली, बुलढाण्यासह

इतर भागांना पाणी मिळते, त्याचवेळी स्थानिक शेतकऱ्यांचे हितही जपले गेले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. पाणी सोडण्याचा प्रस्ताव पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील संनियंत्रण समितीकडे असून, बैठकीत अंतिम निर्णय होणार असल्याचे खरात यांनी सांगितले. या बैठकीत सहभागी होऊन शेतकऱ्यांसाठी ठोस निर्णयाची मागणी करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पाणीवाटपाची पुरेशी माहिती न घेता विधाने करणे दुर्दैवी असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राजकीय नाट्य होऊ देणार नाही, असेही ते म्हणाले. मोर्चात किशोर गारोळे, आशिष रहाटे, निंबाजी पांडव, ॲड. आकाश घोडे, स्वातीताई नवले यांच्यासह पदाधिकारी आणि शेतकरी सहभागी झाले. आंदोलनस्थळी सिंचन, महसूल व पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मोर्चानंतर दोन दिवसांत बैठक घेण्याचे आश्वासन मिळाले. मात्र, बैठक झाली म्हणजे प्रश्न सुटला असे होणार नाही. प्रत्यक्ष सिंचनासाठी पाणी सोडण्याचा निर्णय कधी होणार, याकडे मेहकरलोणार परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. केवळ आश्वासन नको; शेतात पाणी पोहोचावे, अशी मागणी खरात यांनी केली.

दिवसा अपहरणाचा गाजावाजा रात्री नातेवाइकांच्या ताब्यात!

अनिरुद्ध शिंगणे प्रकरणात मोठे वळण! चौकशीनंतर पुढील ताब्याची गरज नसल्याचा हमीपत्रात उल्लेख

जनसंचलन-देऊळगाव राजा

सराफा व्यापाऱ्याला वाहनात बसवून नेल्यानंतर जिल्हाभर उडालेली पोलिसांची धावपळ साखरखेर्डात अडवलेली इनोव्हा अन् तेलंगणा पोलिसांच्या चौकशीचा उलगडा! या नाट्यमय घटनाक्रमात आता महत्त्वाची माहिती समोर आली आहे. अनिरुद्ध मधुकर शिंगणे यांना चौकशीनंतर नातेवाइकांच्या ताब्यात दिल्याचा उल्लेख उपलब्ध हमीपत्र व स्वीकृतीपत्रात आहे. देऊळगाव मही येथील शिंगणे यांना नविपेट पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक २७२/२०२६, बीएनएस कलम ३३१(३), ३०५ संदर्भातील चौकशीसाठी निजामाबाद पोलीस आयुक्तालयाच्या सीसीएस पथकातील पोलीस निरीक्षक चि. अजय यांनी सोबत घेतल्याचे पत्रात नमूद आहे. चौकशी व पडताळणीनंतर त्यांच्या पुढील ताब्याची आवश्यकता नसल्याने त्यांना नातेवाइकांकडे सुपूर्द करण्यात आल्याचे पत्र सांगते. २ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजता मालेगाव येथे मामा उद्धव चेके आणि सासरे मनोहर चेके यांनी शिंगणे यांना सुखरूप व चांगल्या प्रकृतीत ताब्यात घेतल्याची नोंद आहे. तपास अधिकारी, पोलीस किंवा न्यायालयाने बोलावल्यास शिंगणे यांना उपस्थित करण्याची हमी नातेवाइकांनी दिली आहे. दिवसभर चर्चेचा धुरळा उडवणाऱ्या प्रकरणात आता हमीपत्रातून नवी बाजू पुढे आली आहे. मात्र, संबंधित गुन्ह्यातील शिंगणे यांची नेमकी भूमिका अथवा चौकशीचा सविस्तर निष्कर्ष या पत्रात स्पष्ट केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणातील पुढील तपशीलांसाठी संबंधित पोलिसांच्या अधिकृत माहितीकडे लक्ष लागले आहे. पुढील तपासाबाबत सविस्तर खुलासा अद्याप अपेक्षित आहे.

माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियानाला गती

देऊळगाव राजा व सिंदखेडराजा येथे तालुकास्तरीय कार्यशाळा संपन्न

जनसंचलन-बुलढाणा

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, गावपातळीवर आरोग्यविषयक जनजागृती वाढविणे तसेच ग्रामपंचायत आणि आरोग्य विभागाच्या समन्वयातून गावांचे आरोग्य अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ङ्कमाझं गाव, आरोग्य संपन्न गावफ अभियानांतर्गत देऊळगाव राजा व सिंदखेडराजा येथे तालुकास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आले. यावेळी अभियानाची उद्दिष्टे, नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजित मंडाले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र साळवे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यशाळेत माता व बाल आरोग्य, नियमित लसीकरण, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध व नियंत्रण, क्षयरोग व कुष्ठरोग निर्मूलन, किशोरवयीन आरोग्य, पोषण, स्वच्छता, आरोग्य तपासणी तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविणे, लोकसहभागातून आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करणे आणि ग्रामपंचायत व आरोग्य विभागातील समन्वय अधिक मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला. अभियानांतर्गत आतापर्यंत झालेल्या कामकाजाचा आढावा घेऊन आगामी काळातील उपाययोजनांवरही चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेला सिंदखेडराजा तालुक्यातील गटविकास अधिकारी अजित बांगर, बालविकास प्रकल्प अधिकारी जीवन राठोड, गटशिक्षणाधिकारी स्वप्नील निकम, विस्तार अधिकारी पंचायत भास्कर धुगे, आरोग्य विस्तार अधिकारी राधा आटोळे यांच्यासह देऊळगाव राजा तालुक्यातील संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी विविध गावांचे सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, विस्तार अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, गटप्रवर्तक आणि आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. त्येक गाव आरोग्यदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ग्रामपंचायत व आरोग्य विभागाने परस्पर समन्वय राखून जबाबदारीने काम करणे आवश्यक असून, लोकप्रतिनिधी, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून निरोगी व सुदृढ समाजनिर्मिती करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

दुष्काळाने कंबर मोडली बँकेच्या अटींनी वाट रोखली!

पीककर्जासाठी शेतकऱ्यांची फरफट; स्टेट बँकेत धडक! नियमित कर्जफेड करणाऱ्यांनाही अडवणूक होत असल्याचा आरोप; अक्षय पाटलांचा तीव्र आंदोलनाचा इशारा!

जनसंचलन/ जळगाव जामोद

दुष्काळाने आर्थिक कोंडी केलेल्या बळीराजाला आता पीककर्जासाठी बँकेचे उंबरठे झिजवावे लागत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. कागदपत्रांची पूर्तता करूनही अटींचा बागुलबुवा उभा करून कर्जासाठी अडविले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. जळगाव जामोद येथील भारतीय स्टेट बँकेत सातबाऱ्यावर पतसंस्थेचा बोजा असलेल्या अथवा मायक्रो फायनान्सचे कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज मिळविताना अडचणी येत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. संबंधित कर्जाची नियमित परतफेड सुरू असतानाही अडवणूक का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या प्रश्नावर सोमवारी, २ नोव्हेंबर रोजी आंदोलक अक्षय पाटील यांनी शेतकऱ्यांसह बँकेत धडक दिली. अनावश्यक अटींचा अडसर दूर करून पात्र शेतकऱ्यांना तातडीने पीककर्ज द्या, अशी मागणी करण्यात आली. इतर काही राष्ट्रीयीकृत बँका पतसंस्थेचा बोजा असतानाही नियमानुसार कर्ज देत असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला. मग स्टेट बँकेतच अडथळे का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला.

पुढील हंगामासाठी पैशांची निकड असताना कर्जप्रक्रियेतील विलंबाने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. बँक प्रशासनाने पात्रतेचे निकष स्पष्ट करून अर्जांवर विनाविलंब निर्णय घ्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळाला नाही, तर बँक प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा अक्षय पाटील यांनी दिला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२८७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८